प्रकरण २रे

# उत्तम तुपे व बाबाराव मुसळे समकालीन ग्रामीण कादंबरी

# प्रकरण २ रे : उत्तम तुपे व बाबाराव मुसळे

## समकालीन ग्रामीण कादंबरी


| अ. क्र. | घटक व उपघटक | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रास्ताविक | २९ |
| २ | ग्रामीण कादंबरीचा प्रारंभ. | २९ |
| ३ | १९२० ते १९४० चा कालखंड | ३३ |
| ४ | १९४५ ते १९६० चा कालखंड | ३४ |
| ५ | साठोत्तरी ग्रामीण कादंबरी | ४० |
| ६ | उत्तम तुपे व बाबाराव मुसळे समकालीन ग्रामीण कादंबरी. | ४६ |
| ७ | उत्तम तुपेंच्या कादंबरीलेखनाचे वेगळेपण | ४९ |
| ८ | बाबाराव मुसळेंच्या कादंबरीलेखनाचे वेगळेपण | ५१ |
| ९ | समारोप | ५२ |
| १० | संदर्भ ग्रंथ सूची. | ५३ |

# प्रकरण २रे – उत्तम तुपे व बाबाराव मुसळे
# समकालीन ग्रामीण कादंबरी

## १. प्रास्ताविक

'झावळं' (१९९१) आणि 'पखाल' (१९९५) ह्या ग्रामीण जीवनाचा वेध घेणाऱ्या महत्त्वपूर्ण अशा कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्या माझ्या एम्. फिल साठीच्या शोधप्रबंधिकेचा अभ्यास विषय असल्याने त्यांचा अभ्यास करीत असताना त्या कादंबरीच्या पूर्वकालीन ग्रामीण कादंबरीचे स्वरूप, वैशिष्ट्ये आणि वेगळेपण पाहणे आवश्यक वाटते. म्हणून या प्रकरणामध्ये 'झावळं' चे उत्तम तुपे आणि 'पखाल' चे बाबाराव मुसळे यांच्या कादंबरी लेखनापर्यंतचा तसेच त्यांच्या समकालीन कादंबरी लेखनाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

हा विचार करीत असताना आर्थिक, सामाजिक,राजकीय आणि सांस्कृतिक स्थित्यंतरातून ग्रामीण कादंबरीमध्ये घडलेल्या बदलांचाही विचार करावा लागतो. या सर्व बदलांचा विचार करीत असताना तत्कालीन कालखंडातील चळवळी आणि साहित्याची भूमिका पाहणे आवश्यक आहे.

थोडक्यात ग्रामीण कादंबरीच्या स्वरूप, विकास व प्रवृत्ती विषयीची चर्चा वैशिष्ठ्यांसह नोंदवणे इथे मला अभिप्रेत वाटते.

## २. ग्रामीण कादंबरीचा प्रारंभ

सामान्यपणे मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून ' यमुनापर्यटन ' (१८५७) या साहित्यकृतीचा उल्लेख करावा लागतो. बाबा पद्मनजी यांनी ही कादंबरी ख्रिस्ती धर्माच्या मतप्रचारार्थ आणि तत्कालिन विधवा स्त्रियांना भोगावे लागणारे दुःख मांडण्याच्या प्रमुख हेतूने लिहिली. याच काळात समाजवास्तव व सामाजिक प्रश्न रेखाटू

पाहणारे हरिभाऊ आपटेसारखे लेखक लिहित होते. पुढे हिच परंपरा वा. म. जोशी , केतकर यांनी चालवली. ग्रामीण कादंबरीच्या प्रारंभाकडे वळताना या काळात लिहिलेल्या वासुदेव मोहोनी यांची 'पीयूषभाषिणी' व मदनमंजिरी (१८८३), व्यं. आ. परब 'क्लेशविमोचन' (१८८४), अण्णाजी इनामदार 'मदनमंजरी' (१८८५) , ग. ना. गांगण 'मंजुळा' (१८८५) या कादंबऱ्याचा विशेष असा उल्लेख करावा लागतो. कारण या कादंबऱ्यांनी प्रथमत: ग्रामीण संदर्भ हाताळले. याचबरोबर तत्काळात विविध सामाजिक सुधारणा करू इच्छिणाऱ्या अनेक समाजसूधारकांनी आपापल्या दृष्टीकोणातून वाटणाऱ्या सुधारणा करण्याचा आपल्या कृतीतून व साहित्यामधून सातत्याने प्रयत्न सुरू ठेवला. यामध्ये महात्मा फुले यांच्या ' शेतकऱ्यांचा असूड ' (१८८३) या ग्रंथाचा व त्यांच्या चळवळीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. या ग्रंथातून शेतकरी वर्गाच्या तत्कालीन वास्तव स्थितीबरोबर त्यांचे अज्ञान, दारिद्रय, अंधश्रद्धा हेच त्यांच्या अधोगतीला कसे कारणीभूत आहे हे परखडपणे सांगितले आहे.

या संदर्भात स. ग.मालसे लिहितात, " शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्यांच्या हीनदीन परिस्थितीचे वर्णन केले आहे. ते एखाद्या ग्रामीण वास्तववादी कादंबरीलाही लाजवील इतके प्रत्ययकारी आहे[१] " म्हणजेच फुल्यांची ग्रामीण वास्तवाची पकड किती घट्ट होती हे आपल्या लक्षात येते. पुढे फुले यांच्या विचारांचा वसा घेऊन ग्रामीण साहित्यामध्ये विविध स्वरूपाचे लेखन झाले. परंतु असे असले तरी मध्ययुगीन मराठी साहित्यातही ग्रामीण जीवनाचे थोडेफार संदर्भ पहावयास मिळतात. महानुभाव, वाङ्:मय, संत साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण कमी अधीक प्रमाणात आलेले आहे. ज्ञानेश्वरांच्या रूपकामधून, संत एकनाथांच्या भारूडापासून निळोबापर्यंतच्या संताच्या रचनेत कृषी जीवनात आलेले संदर्भही याचेच द्योतक आहेत. मध्ययुगीन साहित्यात ग्रामीण जीवन- दर्शनाची समृद्धी आणि सकस परंपरा दिसत

नसली तरी, या कालखंडातील साहित्याने ग्रामीण जीवनाचे काही संदर्भ नोंदवले आहेत, हे विचारात घेणे महत्त्वाचे ठरते. असे असले तरी महात्मा फुले यांच्या वैचारिक क्रांतीने या लेखन क्रांतीला चांगली चालना दिली.

आधुनिक कालखंडात निर्माण झालेल्या साहित्यात या ग्रामीण जीवनाचे चित्रण अधिक परिणामकारक आलेले आहे. कथा, कविता, नाटक तसेच इतर वाङ्:मयप्रकारातून या स्वरूपाचे लेखन झालेले आहे. या संदर्भात मराठी ग्रामीण कादंबरीचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे

ग्रामीण कादंबरीचे लेखन प्रारंभीच्या कालखंडात म. फुलेंच्या विचारांतून प्रेरणा घेऊन झालेले आढळते. यामध्ये कृष्णराव भालेराव हे म. फुलेंच्या चळवळीतील फार मोठे व्यक्तिमत्त्व. सामान्य माणसांच्या शोषणाविरूध्द आवाज उठविणारे आणि बहुजन समाजाच्या उन्नतीला वाहिलेले ' दीनबंधू ' हे पहिले नियतकालिक कृष्णराव भालेकरांनी सुरू केले म. फुले यांच्याप्रमाणेच भालेकरांच्या समग्र वाङ्:मयात सामान्य माणसांचे होणारे धार्मिक शोषण आणि पुरोहितांची हुकूमशाही प्रकट होताना दिसते. त्यांनी एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ या कालावधीत 'दीनमित्र' मधून बळीबा पाटील (१८८८) नावाची ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारी कादंबरी क्रमशः प्रकाशित केली. 'कृष्णराव भालेकर: समग्र वाङ्:मय ' या ग्रंथात सीताराम रायकर यांनी या कादंबरीचा समावेश केला असून या कादंबरीविषयी बरेच टीकात्मक व संशोधनात्मक विवेचन रायकरांनी केले आहे. कादंबरीचे मूळ शीर्षक,'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' असे आहे. कादंबरीला जास्त कथानक नसून बळीबा पाटील यांनी आपल्या कुटुंबियांना आणि गावातील विविध जाती-धर्माच्या मित्रांना सांगितलेली कहाणी आहे.चर्चात्मक स्वरूपाच्या या कादंबरीत शेतकऱ्यांची विविध मोसमातील ऋतुमानाप्रमाणे होणारी शेतीविषयक कामे, त्यांच्या या कामाचे कष्टमयी स्वरूप, शेतकऱ्यांचा तरिही कसाबसा होणारा उदरनिर्वाह, त्यांचे निकृष्ट राहणीमान यांचे दर्शन या कादंबरीत घडते. एकुणच या कादंबरीतून ग्रामीण वातावरण आणि गावगाडा यांचे एक धूसर

चित्र डोळ्यासमोर उभे राहते. सीताराम रायकर यांनी या आपल्या संपादनात कादंबरीला मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी आहे असे म्हटले असले तरी ग्रामीण साहित्याचे एक भाष्यकार डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'पाचोळा' आणि दहा समीक्षक' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत संदिग्धता व्यक्त करताना ते म्हणतात,"एकंदरीत 'बळीबा पाटील' या कादंबरीचा आणि गावगाड्याचा काहीसा प्रत्यय येतो. अर्थात कादंबरीसारख्या वाङ्:मयप्रकारातून ज्या भरघोसपणे ग्रामीण जीवनाचा प्रत्यय यायला पाहिजे तसा प्रत्यय येथे येत नाही. एवढे मात्र खरे एवढ्या सगळ्या मर्यादा मान्य करूनही मराठीतला हा पहिलावहिला प्रयत्न आहे. असे नोंदवायला हरकत नाही."[२]

सारांशपणे असे म्हणता येईल की, 'बळीबा पाटील' या कादंबरीने प्रथमत: अल्प स्वरूपात शेतकरी जीवनाचे व त्यानुषंगाने ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले. या कादंबरीचे लेखन म.फुल्यांच्या आणि सत्यशोधक समाजाच्या दृष्टीकोणातून झालेले आहे.

म.फुले यांच्या विचारधारणेतून 'बळीबा पाटील' नंतर, 'पिराजी पाटील' (१९०३) नावाची धनुर्धारी (रामचंद्र विनायक टिकेकर) यांची कादंबरी प्रसिद्ध झाली. सदर कादंबरी १३ प्रकरणात आणि १३० पृष्ठात विभागली आहे. या कादंबरीत १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातून पडलेल्या दुष्काळाचे वास्तव चित्रण आलेले आहे. पिराजी पाटील हे स्वत: शेतकरी असल्यामुळे त्यांनी हे जीवन अनुभवलेले होते. शेतकऱ्यांच्या शेतीविषयक विविध समस्याचे (दुष्काळामुळे उद्ध्वस्त होणारी खेडी, नैसर्गिक आपत्ती इ.) चित्रण त्यांनी केले आहे. या कादंबरीत प्रथमत:च ग्रामीण जीवनाचे संदर्भ नव्याने चित्रीत केलेले पाहून ग्रामीण साहित्य चळवळीचे अध्वर्यू डॉ आनंद यादव 'ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव' या ग्रंथात,"पिराजी पाटील ही धनुर्धारी यांनी १९०३ साली प्रसिद्ध केलेली पहिली मराठी ग्रामीण कादंबरी मानावी लागते."[३] याचबरोबर 'ग्रामीण वाङ्:मयाचा इतिहास' या चंद्रकुमार नलगे

संपादित ग्रंथात आणि 'ग्रामीण कादंबरी: प्रारंभ ते १९६०' या लेखात डॉ वासुदेव मुलाटे,"पिराजी पाटील पहिली यशस्वी ग्रामीण कादंबरी आहे. हे मान्य करावे लागते."[४] असे मत नोंदवतात:

म.फुलेंच्या विचारांतून प्रेरणा घेऊन या कालखंडात ग्रामीण कादंबरीची निर्मिती झाली असली तरी 'बळीबा पाटील' आणि 'पिराजी पाटील' सारख्या दोन कादंबऱ्या वगळता ग्रामीण जीवनाचे चित्रण फारसे झाले नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षणाचा प्रसार मध्यम वर्गीयांच्या किंवा उच्च वर्गीयांच्या पलिकडे गेलेला नव्हता आणि खेड्यातील सुख -दु:ख, दारिद्र्य, उपासमार हाही लेखन विषय होऊ शकतो. याची जाणीवही फारच थोड्या लोकांना होती. अशी कारणे ग्रामीण जीवनाचे चित्रण अभावानेच होण्यामागे असावीत. परंतु १९२० नंतरच्या कालखंडात ही परिस्थिती बदलली. शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यापर्यंत झाला. बहुजन समाज शिकू लागला याच काळात महाराष्ट्रात सामाजिक आणि राजकीय स्वरूपाचे बदल घडू लागले. म.गांधीच्या नेतृत्त्वाने राजकीय क्षेत्रात अनेक बदल घडून आले. गांधीजीची दृष्टी राजकारणासह संपूर्ण जीवन व्यापणारी होती. ग्रामीण समाज हा आपला मुख्य समाज आहे. आणि आपण तिथपर्यंत पोहचले पाहिजे असा विचार त्यांनी मांडला. त्यांच्या 'खेड्याकडे चला'! या संदेशाने लेखक खेड्याकडे वळले.

## ३. १९२० ते १९४० चा कालखंड

या कालखंडातील कादंबऱ्याचे स्वरूप पाहता त्यामधून ग्रामीण जीवनाचे दैन्य, दारिद्र्य, अंधश्रद्धा,विषमता आणि खेड्यातील कायापालट करण्याची भूमिका मुख्यत्त्वेकरून स्पष्ट होते. याच जाणिवेतून अनेक लेखक खेड्याकडे वळले.याचा परिणाम ग्रामीण कादंबरांमध्ये अमुलाग्र परिवर्तन घडण्यात झाला. याच प्रयत्नातून प्र.ह.खाडीलकर यांची 'स्वाधीन संसार' (१९२७) या नावाची कादंबरी

विचारात घ्यावी लागेल. खेड्यांचा उद्धार कसा होईल हे सांगण्याचा प्रयत्न अत्यंत भावूकपणे या कादंबरीत केला आहे. भा. वि.वरेरकर यांनी 'सात लाखांतील एक' (१९३०) या कादंबरीत ग्रामीण जीवन, शेतकरी व खेड्यामधून शहरात आलेल्या कामगार वर्गाविषयीची आस्था चित्रीत केली. याच काळात रा.शा.पाटील 'सीता,' (१९३१) ग.रा. वाळिंबे तथा रामतनय 'मोहित्यांची मंजुळा,' (१९३१) या कादंबऱ्यांनी ग्रामीण जीवनाची व तेथील वास्तवाची तोंडओळख करून दिली.

पुढच्या काळात म्हणजे १९३७ ला वि.वा. हडप यांनी 'अन्नदाता उपासी' नावाची कादंबरी लिहून वैचारिकदृष्ट्या स्वतंत्र मार्ग चोखाळला. हडप यांच्यावरती मार्क्सवादाचा प्रभाव आढळतो. तत्पूर्वी वा.म.जोशी 'इंदु काळे, सरला भोळे' (१९३४) वि.स.खांडेकर 'कांचनमृग '(१९३१) 'दोन ध्रुव' (१९३५), उल्का (१९३४), साने गुरूजी 'श्यामची आई' ( १९३५) या कादंबऱ्यांतून गांधीवादी प्रेरणेच्या दृष्टीने ग्रामीण जीवन चित्रीत केले.

थोडक्यात, १९४० पर्यंतची ग्रामीण कादंबरीने स्वप्नरम्यतावाद आणि ध्येयवादी आदर्शवाद अशा दोन डोळ्यांनी ग्रामजीवनाकडे पाहिले . त्यात एका स्थिर संस्कृतीचे दर्शन होते. म.फुले यांची प्रेरणा होती. इथपर्यंतची कादंबरी प्रेरणाभिन्नतेतून आकारास आली. धनुर्धारी, ना.वि.कुलकर्णी यांनी ग्रामीण वास्तवचित्रीत करण्याच्या प्रेरणेतून लेखन केले. भालेकर,सानेगुरूजी यांच्या लेखनप्रेरणा वेगळ्या असल्या तरी त्यांच्या कादंबरी वाङ्‌मयातून अभावितपणे ग्रामीण जीवन आविस्कृत झाले. पुढे यातूनच प्रादेशिक कादंबरीचा उदय झाला. ती एक प्रकारे ग्रामीण कादंबरीच होती. ग्रामीण समूह जीवनाशी एकजीव होऊन भूप्रदेश चित्रीत करणे हा तिचा उद्देश होता.

## ४. १९४५ ते १९६० चा कालखंड

सर्वसाधारणपणे १९३८ नंतरच्या काळात भारतीय

स्वातंत्र्ययुद्धात कमालीचे गतीमान झाले. क्रांतीची बीजे खेड्यापाड्यातील सामान्य माणसांपर्यंत पोहोचली. अनेक लेखक, विचारवंत, राजकीय प्रवक्ते यांनी आपले लक्ष खेड्याकडे वळविले. कादंबरी क्षेत्रातही बदल होताना 'प्रादेशिक कादंबरी' म्हणून नवीन प्रकार अवतरला. ही प्रादेशिक कादंबरी एकप्रकारे ग्रामीणच होती. विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे नागरी जीवनापासून पूर्णतः अलिप्त राहिलेला एखादा विभाग आपल्या लेखनाचा विषय म्हणून कादंबरीकारांनी स्विकारला. त्या विशिष्ट प्रदेशातील निसर्ग, हवामान, वातावरण, पिके,समाजव्यवस्था, सण,उत्सव,सुख-दुःखे, नीति-अनीती, जगण्याच्या पद्धती, भाषा,वाक्यप्रचार, म्हणी,त्याच्या विविध रूढी कल्पना, त्यांची दैवते, संघर्ष, समस्या,व्यथा,कथा यांचे खोलवर निरीक्षण करून तिथल्या समाजजीवनाशी एकजीव होऊन तो विशिष्ट भूप्रदेश प्रादेशिक कादंबरीत चित्रीत करण्यात येऊ लागला.

याबाबतीत प्रादेशिक कादंबरीचे जनक म्हणून आपणाला र.वा. दिघे यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी 'पाणकळा' (१९३९) ही कादंबरी प्रसिद्ध करून प्रादेशिक चित्रण प्रथमतः केले. या कादंबरीच्या कथानकास सजनपूर भोवतीच्या रम्य निसर्गाची आणि ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी लाभली आहे. शेतकऱ्यांचे निसर्गावलंबी जीवन , त्यांचे दारिद्रय, त्याच्या आयुष्यावर पडलेला सावकारी पाश,भूमिहीन अवस्थेत होणारी तारांबळ,दुष्काळाच्या तडाख्यामुळे होणारी वाताहात, घराण्याची पूर्वापार वैमनस्ये, त्यातून उद्‌भवणारे संघर्ष,सजलपूर आणि भिल्ल टोळीचे संबंध इ. अनेक बाबींच्या चित्रणातून येथील ग्रामजीवन साक्षात आलेले दिसून येते. या कादंबरीबरोबर, र.वा.दिघे यांनी 'सराई',(१९४३)'पड रे पाण्या', (१९५८) 'निसर्गकन्या' ,'रानजाई,'(१९४६) 'गावलुब्ध,' 'मृगनयना'(१९४७), 'आई आहे शेतात' (१९५६), 'कार्तिका' (१९६५)या कादंबऱ्यातून तेथील प्रदेश,लोकसमूह,रूढी,परंपरा,अंधश्रद्धा रीतिरिवाज इ.चित्रण त्या प्रदेशातील बोलीसह साकार करण्यात दिघ्यांना यश आले आहे. या संदर्भात उषा हस्तकांनी,"प्रादेशिक कादंबरीची

निश्चित चाहूल 'पाणकळातच' लाभली होती"[५] असे म्हटले असले तरी डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात त्याप्रमाणे,"मराठी कादंबरी वाड्:मयात ग्रामीण कादंबरीचा प्रवाह निर्माण करण्याचे श्रेय 'पाणकळा' कडेच जाते. मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना 'पाणकळा'चे ऐतिहासिक महत्त्व मान्य करावेच लागेल."[६]

दिघे यांच्यापासून सुरू झालेल्या ग्रामीण म्हटले तर एका अंगाने प्रादेशिक जीवन चित्रणाच्या परंपरेत पुढे श्री.ना.पेंडसे आणि गो.नी.दांडेकर यांनी मोलाची भर घातली. पेंडसे यांच्या 'एल्गार'(१९४९) आणि 'हद्दपार' (१९५०)या दोन्ही कादंबऱ्यामधून हर्णेचा परिसर जिवंत केला. तर 'गारंबीचा बापू' (१९५२)मधून गारंबीचा परिसर जिवंत केला. दांडेकरांनी 'पडघवली','शितू' (१९५३), 'पवनाकाठचा धोंडी' (१९५५), पूर्णामायची लेकरं (१९५८), 'माचीवरचा बुधा' (१९५८), 'जैत रे जैत'(१९६५) अशासारख्या कादंबऱ्यातून निसर्गाचा व ग्रामीण जीवनाचा नेमका वेध घेतला. दांडेकरांची दृष्टी 'जुने ते चांगले, नवे ते डागाळलेले' अशी होती. पेंडसेंच्या लेखनासंबंधी डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "श्री ना.पेंडसे यांनी आपल्या कादंबरी वाड्:मयातून प्रादेशिकतेची एक सखोल जाणीव व्यक्त केली. प्रदेश आणि तिथल्या माणसांमामध्ये असलेल्या अभिन्नत्त्वाचा शोध त्यांनी घेतला.वास्तव शोधांची ही एक दिशा होती,"[७]

याच कालखंडात ग्रामीण कादंबरीकारावर रंजनवादी विचारांचा प्रभाव पडला. यादृष्टीने ना.सी. फडके यांच्या प्रभावातून ग.ल.ठोकळे यांनी 'गावगुंड'(१९४५)या कादंबरीतून रोमॅंटिक प्रवृत्ती व सुधारणावाद यांचे चित्रण केले. 'गावगुंड' मध्ये स्वातंत्र्य संग्रामाचा एक भाग म्हणून सातारा जिल्ह्यात आणि त्याच्या परिसरात झालेल्या दहशतवादी आंदोलनाची पार्श्वभूमी चित्रीत केलेली आहे. याच काळात ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण घडवणारी 'चंदनवाडी' (१९४३) ही साम्यवादी

विचारांचे समर्थन करणारी ग.त्र्यं. माडखोलकरांनी कादंबरी लिहिली. या कादंबरीत जमीनदाराकडून गरीब शेतकरी आणि शेतमजूरांची होणारी छळवणूक, अस्पृशांवर स्पृश समाजाकडून होणारे अत्याचार आणि गिरणी कामगारांच्या हलाखीचे चित्रण आलेले आहे.त्यांच्या इतर कादंबऱ्यामधून राजकीय जीवन,स्त्री-पुरूष संबंध, उच्च मध्यमवर्ग आणि श्रीमंताचे जीवन आले आहे. याशिवाय विठ्ठल दत्तात्रय चिंदरकर यांनी 'महापूर'(१९४३) या कादंबरीमध्ये खेड्यातील भयाण,विद्रुप वास्तव दारिद्र्य,शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक ,ग्रामीण पातळीवरची जातीयता आणि गांधीजींनी माणसांचे हृदय परिवर्तनाचा मांडलेला विचार खेड्यात रूजणे शक्य नाही याचे समर्थन केले आहे. याशिवाय म.भा.भोसले यांची 'समरांगण'(१९४१)श्रीराम अत्तरदे यांची 'सावलीच्या उन्हात'(१९४०)आणि ग.भि.भिसे यांची 'जंगलातील छाया' '(१९४५)अशा अनेक कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवन आलेले आहे. या कादंबऱ्याचे विशेष म्हणजे वेगवेगळे विषय यामध्ये आलेले आहेत. १९४५ पूर्वीच्या ग्रामीण कादंबऱ्यांचा आढावा घेताना डॉ. वासुदेव मुलाटे 'ग्रामीण कादंबरी: प्रारंभ ते १९६०' या लेखात लिहितात,"१९४५ पूर्वीच्या ग्रामीण कादंबरीने ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श केला.तर दुसरीकडे गावातील कुणबी, मराठा व इतर जातीच्या चित्रणाबरोबर आदिवासी,कातकरी ,ठाकर इ. शेतीमध्ये कष्ट करून जगणाऱ्या कुळवाड्यांच्या जीवनाचेही जीवन चित्रीत केले.[८] स्वप्नरंजन आणि तत्त्वज्ञान, अद्भूतरम्यता याचांही वापर या काळातील लेखकांनी मुक्तपणे केला. त्यामध्ये ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण करण्याकडे त्यांचे बरेच दुर्लक्ष झाले; असे म्हणावयास हरकत नाही,"[८]

१९४५ नंतरचा काळ हा ग्रामीण कादंबरीच्या दृष्टीने महत्त्वाचा कालखंड मानला जातो. हा काळ एकून वाङ्:मयातील परिवर्तनाचाच काळ आहे. या काळातील ग्रामीण कादंबरीचा विचार करताना बा.सी. मर्ढेकर यांची प्रथमत: दखल घ्यावी लागते. त्यांनी,'तांबडी माती'

(१९४३)आणि 'पाणी' (१९४२) या दोन्ही कादंबऱ्यातून आधुनिकीकरणामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. मर्ढेकरांनी या कादंबऱ्यातून मनोविश्लषणाचा शोध घेतला असला तरी, या कादंबऱ्यामध्ये ग्रामीण जीवन चांगल्या प्रकारे मांडले आहे. शेतीची मशागत करून तिची सेवा करणे व त्यातून आपला निर्वाह चालवणे हेच खऱ्या शेतकऱ्यांचे कर्तव्य आहे.तो कुठेही असला तरी त्याच्या काळ्या आईचे शेतीचे आकर्षण असणारच हे 'तांबडी माती' मध्ये सांगण्याचा प्रयत्न आहे. तर आपली जमीन आपले गाव उद्ध्वस्त करून उभे राहणारे सर्व सोईचे 'विजेचे गाव' आपले नाही असे वाटणाऱ्या मनाचे चित्रण 'पाणी' कादंबरीत मर्ढेकरांनी केले आहे. 'पाणी'या कादंबरीविषयी डॉ. अ.ना.देशपांडे लिहितात,"प्रतिपाद्य विषयाला यथायोग्य न्याय देण्याच्या दृष्टीने या कादंबरीचे सामर्थ्य अपूरे पडत असले तरी एवढे मात्र खरे की, खेड्ूतांच्या जीवनाचे सहृदयतेने व परिणामकारक शेतीने चित्रण करण्यात लेखकाला कौतुकास्पद यश मिळाले आहे,"[१]

याशिवाय याच काळात विविध जाती-जमातींचे चित्रण येऊ लागले. विभावरी शिरूरकर यांनी 'बळी'(१९५०)या मधून गुन्हेगार जमातीचे चित्रण उभे केले. पोटासाठी वनवन भटकणारी ही जमात ग्रामीण जीवनाचाच एक भाग आहे. दारिद्रय, निरक्षरता व अंधश्रद्धाजपणाऱ्या या माणसांचे दिशाहीन जीवन या कादंबरीत आले आहे. मुख्यत्त्वे करून स्त्री जीवनातील समस्याचे चित्रण करणाऱ्या विभावरीनी ग्रामीण भागातील उपेक्षितांचे जग वाचकांपुढे उभे केले हे विशेष महत्त्वाचे आहे.

१९५० ते १९६० या कालखंडात मराठी साहित्याच्या परिवर्तनाला नवसाहित्यामुळे प्रारंभ झाला. नवसाहित्यातील वास्तव शोधण्याची,प्रेरणा, मानवी नेणिवेचा शोध आणि कलाकृतीच्या घाटासंबंधीचे भान या गोष्टीचा परिणाम साहित्यावर होऊ लागला. याच कालखंडात वास्तववादी ग्रामीण कादंबरीच्या नव्या गुणाला प्रारंभ झाला. व्यंकटेश माडगूळकर,आण्णाभाऊ साठे, उद्धवशेळके आणि

रणजित देसाई इ. लेखकांनी त्यात मोलाची भर घातली.

व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी'(१९५५) ही ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहातील वैशिष्ट्यपूर्ण आणि वास्तवाचा स्पर्श लाभलेली कादंबरी आहे. या कादंबरीतून ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा अनेक बाबींवर प्रकाश टाकला आहे. त्यातून त्यांची ग्रामीण जीवनासंबंधीची ग्रामरचनासंबंधी असणारी पकड व परिपक्वता दिसते.यासंबंधी डॉ.वासुदेव मुलाटे म्हणतात,"व्यंकटेश माडगूळकरांना ग्रामीण वास्तवाची चांगली जाण व समज आहे. खेडे, खेड्यांची रचना,तेथील समाजव्यवस्था, त्या व्यवस्थेतील स्तर आणि या सर्वांमधून उभे राहणारे ग्रामीण जीवन, त्यांच्या चांगले परिचयाचे, अनुभवाचे आहे. त्यातील विविध वृत्ती,प्रवृत्ती,माणसे आणि त्यांच्या व्यथा, वेदना, समस्या त्यांनी कथांमधून शब्दबद्ध केल्या होत्याच, 'बनगरवाडी' कादंबरीत त्यांचे हे लेखन सामर्थ्य प्रयत्नाला येते. लेखकाचा प्रकृती धर्म अनुभवाची जाण आणि अभिव्यक्ती यांचा अपूर्व संयोग येथे जाणवतो."[१०] या छोटेखानी कादंबरीत माणदेशातील एका छोट्याशा उजाड अभावग्रस्त खेड्यातील जीवनचित्रण माडगुळकरांनी रेखाटले आहे. म्हणजेच ग्रामीण कादंबरीच्या विकासाच्या वाटचालीत मैलाचा दगड ठरावी अशीच ही कादंबरी आहे.

'धग' (१९६०)ही उद्धव शेळके यांची या टप्प्यातील एक महत्त्वाची कादंबरी या कादंबरीमध्ये कौतिक या शिंपी कुटुंबातील स्त्रीच्या जगण्याची धडपड, आसक्ती आणि जिद्द,जगण्यासाठी तिने काढलेल्या खस्ता, इच्छा,आंकांक्षा, सोशिकपणा,नवरा व त्याच्याचर असणारी निष्ठा,पोरावरची माया,सत्त्वाचा पीळ आणि अमर्याद कष्ट या सर्वांमधून कौतिकचे अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व उभे राहते. वैदर्भीय बोलीभाषेसह ग्रामीण वास्तवाचा अतिशय सकस आविष्कार घडवणारी आणि पूर्णपणे ग्रामीण वास्तवाचा अतिशय सकस आविष्कार घडविणारी आणि पूर्णपणे ग्रामीण बोलीत आकाराला आलेली पहिली कादंबरी असल्याने ती वेगळी

ठरावी अशीच आहे. 'धग' चा मोठेपणा नोंदविताना म.सु.पाटील म्हणतात," 'धग' ही कठोर वास्तवाचे कलात्मक रूप आविष्कृत करणारी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी होय."[११]

याशिवाय शेळके यांनी 'बाईविना बुवा' (१९६३)या कादंबरीतून लैंगिक अनुभवाचे दाहक रूप मांडले आहे. तर 'डाळिंबाचे दाणे'(१९७७) मधून तमाशा कलावंताच्या जीवनाचे चित्रण केले आहे. या दोन्ही कादंबऱ्याचा विचार करता शेळके यांनी ग्रामीण जीवन चांगल्या अर्थाने मांडले .

रणजित देसाई या ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून मान्यता पावलेल्या कादंबरीकाराने 'बारी,'(१९५९) 'माझा गाव,'(१९६०). 'समीधा'(१९७१)इ. कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवन चित्रीत केले आहे. 'माझा गाव' मध्ये ग्रामीण भागातील कोसळलेली मूल्यव्यवस्था, स्वत:च्या कुळाविषयीच्या ग्रामीणांना वाटणारा अभिमान,त्यांचा स्वाभिमान यामधून ग्रामीण जीवनानुभव ते अर्थपूर्ण करीत जातात तर 'बारी' मधून भटके विमुक्त जनजीवन प्रकट करण्याचा प्रयत्न केला आहे.

१९४५-१९६० या संपूर्ण पंधरा वर्षाच्या कालखंडात ग्रामीण कादंबरीचा अनेकविध पातळ्यावर विकास आणि विस्तार झालेला दिसतो. कधी वास्तववादी दृष्टीने तर कधी रंजनवादी वृत्तीने ग्रामीण जीवन मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. तसेच ग्रामीण जीवनातील विविध जातीजमातींचे चित्रण अशा अनेक अंगानी ग्रामीण कादंबरीचा विकास आणि विस्तार काळ. एकूणच या कालखंडात मराठी ग्रामीण कादंबऱ्यामधून विशिष्ट ग्रामीण परिसरातील वास्तवाला कलात्मक पातळीवर साकारण्याचा प्रयत्न दिसतो.

## ५. साठोत्तरी ग्रामीण कादंबरी

१९६० नंतरचा काळ मराठी ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. १९४० -५० पासून तिच्यात होऊ लागलेले बदल

१९६० नंतर अधिक स्पष्टपणे दृग्गोचर झाले. ग्रामीण,दलित,राजकीय,ऐतिहासिक,पौराणिक, अस्तित्त्ववादी जाणीव अशा अनेक दिशांनी ती झपाट्याने विकसित झाली. समाजवास्तवाची नवनवीन क्षेत्रे धंडाळू लागली.

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण समाजाला त्यांचे रास्त स्थान मिळण्याच्या प्रक्रियेला वेग आला. लोकशाही आणि सार्वत्रिक निवडणूका यांनी बहुजन समाजाला आपल्या हक्काची आणि महत्त्वाची जाणीव झाली. ग्रामीण भागातून एक नवे नेतृत्त्व उदयाला आले. आणि त्याने झपाट्याने राजकीय सत्ता आपल्या हाती घेतली. स्थानिक स्वराज्य संघाच्या रूपाने सत्तेचे विकेंद्रीकरण झाले आणि तिचे पाझर गावापर्यंत येऊन पोहोचले. कूळकायद्यासारखे ग्रामविकासाच्या शासकीय योजना, नवे तंत्रज्ञान व पाणी पुरवण्याचे प्रयत्न, सहकार चळवळी यातून परंपरागत शेती आणि गाव यात बदल होऊ लागले.या बदलाचे आकलन होण्यासाठी आवश्यक असा शिक्षणप्रसार झाला. जिल्ह्याच्या ठिकाणी महाविद्यालये आणि गावोगावी माध्यमिक विद्यालये निघाली . प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत झाले. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाला शैक्षणिक सवलती मिळाल्या. दलितांना शिष्यवृत्त्या आणि नोकरीत हक्काच्या राखीव जागा देण्याचे धोरण जाहीर झाले.१९६० ला संयुक्त महाराष्ट्राचे रचना अंशत: साकार झाले. आणि महाविद्यालये तालुक्यापर्यंत जाऊन पोहोचली. शिक्षण सार्वत्रिक,सक्तिचे ,मोफत वा सर्वासाठी खुले होताच समाजाच्या सर्व थरातून आणि महाराष्ट्राच्या सर्व भागातून नवशिक्षितांची अनेकवर्गीय,अनेकजातीय,बहुजिनसी पिढी बाहेर पडू लागली.

१९६० नंतर उदयास आलेल्या नव्या पिढीला ग्रामजीवनाची पूर्वीच्या साहित्यातील चित्रण अपूरे व कृतक वाटू लागले व असमाधानातून हा नवा वाचक स्वत:च लेखनाचा प्रयत्न करू लागला. आपण अनुभवलेले पण साहित्यात न आलेले जीवन नव्याने चित्रित करू लागला या नवतरूणांनी ग्रामीण भागातील जीवनानुभव मांडण्यास सुरूवात केली. खेड्यात निर्माण होणारे नवनवीन प्रश्नांचे चित्रण



14752
A

करण्यात अनेक लेखकांना यश आले. त्यामध्ये शंकर पाटील,हमिद दलवाई, रा.रं.बोराडे ,आनंद यादव, ना.धों.महानोर, अण्णाभाऊ साठे इ. कादंबरीकारांनी मोलाची भर घातली.

आण्णाभाऊ साठे यांनी ग्रामीण भागातील दलितांचे चित्रण करून ग्रामीण कादंबरीच्या विकासात मोलाची भर घातली आणि दलित कादंबरीचा उगम झाला. अण्णाभाऊंनी आपल्या 'फकिरा'(१९५९)'वैजयंता'(१९५९)'माकडीचामाळ,'(१९६३),'आवडी,' (१९६३) 'वैर'(१९६४) 'रामगंगा' (१९६५)'मास्तर'(१९६६)'वारणेचा वाघ' (१९६८) या कादंबरीतून दलितांचे वास्तव दर्शन घडविले आहे. 'फकिरा' ही अण्णाभाऊंची सर्वात जास्त लोकप्रिय ठरलेली कादंबरी.

शंकर पाटील यांनी आपल्या 'टारफुला' (१९६४)मधून गावातील गुंडगिरी संपूर्ण गावाला कशी मारक ठरते हे सांगितले. या कादंबरीत कोणतीही एक व्यक्ती केंद्रस्थानी नसून खेड्यातील सत्ताधारी आणि सत्ताविरोधी वर्ग हा संघर्ष आहे. कथनशैलीचा उत्कृष्ट नमूना म्हणून ही कादंबरी महत्त्वाची वाटते.

टारफुला नंतर १९६५ मध्ये हमीद दलवाई यांनी 'इंधन' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीमध्ये चिपळूनच्या परिसरातील खेड्याचे जीवलचित्रण आलेले आहे. तसेच मुसलमान,खोत,कुणबी,बौद्ध यांच्यातील परस्पर संघर्षाचे अत्यंत बारकाईने दर्शन घडविले आहे. यामध्ये कोकणातील खास मुसलमानी बोली वापरली. त्यामुळे कादंबरी अधिक परिणामकारक ठरली आहे. या कादंबरीत ग्रामीण भागातील मुस्लीम समाजाचे चांगले चित्रण आले आहे.या कादंबरीने स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू-मुस्लीम संबंधात निर्माण झालेले ताणतणाव अचूक टिपले आहेत. लेखकाच्या ठायी कुठलाही धार्मिक अभिनिवेश नसल्याने तो अनुभवाकडे पुरेशा तटस्थाने पाहू शकला आहे. व सनंजसपूर्वक चित्रण करू शकला आहे.

याच काळात चिं.त्र्यं. खानोलकर यांनी 'रात्र काळी घागर काळी,' (१९६३)'अजगर',(१९७५)'भागधेय'(१९७६) 'कोंडुरा'(१९६६) या

कादंबऱ्यातून दक्षिण कोकणातल्या निसर्गाचे आणि समाजजीवनाचे चित्रण आपल्या कादंबऱ्यातून केले. तसेच मधू मंगेश कर्णिक यांनीही 'माहिमची खाडी',(१९६९) 'देवकी'(१९६२) 'भाकरी आणि फूल'(१९८२) या कादंबऱ्यामधून महानगरीय झोपडपट्टी वास्तवाचे विदारक चित्रण केले.

साठोत्तरी ग्रामीण कादंबरीच्या विकास आणि विस्ताराच्या टप्प्यावरील 'पाचोळा' (१९७१), 'गोतावळा'(१९७१)या महत्त्वाच्या कादंबऱ्या होत्या.या कादंबऱ्यातून शहरीकरणामुळे यंत्रयुगामुळे आणि भांडवलशाही व्यवस्थेमुळे नष्ट होत चाललेले पारंपरिक व्यवसाय त्यावर उपजीविका करणाऱ्या कुटुंबाची होणारी वाताहात चित्रीत केली आहे. ' पाचोळा ' ही बोराटे यांनी ग्रामीण बोलीभाषेत लिहिलेली मराठीतील पहिली कादंबरी आहे. मराठवाड्यातील एका खेड्यातील गंगाराम आणि पारबत्ती या शिंपी कुटुंबाची शोकांत कहाणी आहे. कादंबरीतील जीवनानुभव, व्यक्तिरेखा, सामाजीक वास्तव आणि भाषा यासह प्रतितीक्षम झाला आहे. कलारूप पावला आहे. याचबरोबर रा. रं. बोराडे यांनी 'पाचोळा' शिवाय ग्रामीण राजकारणाचे चित्रण करणारी , ' आमदार सौभाग्यवती', चारापाण्याच्या प्रश्नांची तीव्रता प्रकट करणारी ' चारापाणी ' (१९८९) शिवाय ग्रामीण तरूणाच्या शिक्षणाचे प्रश्न चित्रीत करणारी ' सावट ' (१९८७) या कादंबऱ्याही लिहिल्या आहेत.

डॉ. आनंद यादव यांनी ' गोतावळा ' (१९७१) मधून प्राणीसृष्टीच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे. ग्रामीण कादंबरीत पहिल्यांदाच प्राण्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा जिवंत प्रत्यय घडविला आहे. मुक्या प्राण्यांना बोलते करून त्यांच्या जीवनाचे दर्शन घडविणारी ही पहिलीच कादंबरी असावी. एकीकडे ग्रामीण भागाच्या सुधारणासाठी यांत्रिकीकरणाची स्वागतार्हता तर दुसरीकडे या यांत्रिकीकरणामुळे उद्ध्वस्त होणारे जीवन अशे अनेक प्रश्न या कादंबरीमधून निर्माण झालेले आहेत. तसेच कोल्हापूर, कागल परिसरातील बोलीभाषेचा निवेदनासाठी वापर ही देखील नवीन भर आहे.

याशिवाय यादवांनी ' झोंबी ', 'नांगरणी ' या आत्मचरित्रात्मक तसेच ' नटरंग ' (१९८०) या कादंबरीतून ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

याच कालखंडात ना. धों. महानोर यांनी लिहिलेल्या 'गांधारी ' (१९७३) या कादंबरींतून स्वातंत्र्यपूर्व काळात रझाकारी जुलमाखाली आणि स्वातंत्र्योत्तर काळात जगदेवसारख्या गावठी पुढाऱ्यांच्या कारवायाखाली भरडून निघणाऱ्या ' गांधारी ' खेड्याचे वास्तवदर्शी चित्रण झाले आहे. या खेड्यातील ग्रामपंचायती निवडणूका, भष्ट्राचार, स्वातंत्र्योतर ग्रामीण जीवनातील ताणतणाव, सहकारी योजना, कर्ज, कलानिती इ. सारखे अनेक विषय मांडून महानोर यांनी ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्र उभे केले आहे.

१९६० नंतर लिहू लागलेल्या लेखकापैकी महादेव मोरे आणि चंद्रकुमार नलगे यांनीही आपले अनुभव मांडले आहेत. महादेव मोरे यांनी पांढरपेशा विश्वाबाहेरची जगण्यासाठी धडपडणारी माणसे उभी केली आहेत. विडी कामगारांचे प्रश्न, शरीर विकणाऱ्या स्त्रिया, ट्रकबरोबर भन्नाटा जगणारे पुरूष, डोंबारी, मांगगारूडी यांचे जीवन अशा ग्रामीण व्यवसायाचे चित्रण केले आहे. त्यांनी ' एकोणिसावी जात ', (१९६८) ' घनौती ' (१९६९), ' स्टॅंड ', (१९७८) मधून मोटार धंद्यातील माणसाचे विश्व साकार केले आहे. याशिवाय ' वर आभाळ खाली धरती ' (१९७३) सारख्या कादंबरीतून जोगतीणीचे वास्तवदर्शी जीवन चित्रण केले आहे.नवशिक्षितांच्या नोकरीचा प्रश्न 'प्रवाह'(१९७६) मधून मांडला या सर्व कादंबऱ्यामधून मोरे यांनी ग्रामीण भागातील तळागाळातील समाजाचे चित्रण केले.

चंद्रकुमार नलगे यांनी 'आगिनफूल,'(१९७४) 'गस्त,'(१९७६) 'देवाची साक्ष'(१९७१)इ.कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे. याचबरोबर ग्रामीण माणसांची आगतिकता,सोशिक वृत्तीने जगण्याची त्यांची धारणा आणि ग्रामीण भागातील कौटुंबिक वास्तवाचे चित्रण त्या कादंबऱ्यातून आले आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ग्रामीण जीवनातील विविध घटकांचे आणि ग्रामीण समाजाच्या स्थित्यंतरांचे चित्रण शंकर खंडू पाटील यांनी 'सरपंच'(१९६१) 'घुंगरू'(१९७३), 'कुलवती'(१९७३), 'बेईमान'(१९७६)इ. कादंबऱ्यामधून घडविले. याशिवाय दि. वि.जोशी यांनी 'जागवेला',(१९६३) 'येरझरा'.(१९७०)आणि 'सरघा'(१९६९) या कादंबऱ्यामधून परंपरागत खेड्यामध्ये होणाऱ्या बदलांची व्यथा मांडली आहे. तर माधव यादव यांनी 'बोरगाव'(१९७७)मधून खेड्यातील जुन्या प्रतिष्ठित कुटुंबाच्या वाताहतीचे चित्र उभे केले आहे. श्रीपाद काळे यांनी 'कातळावरचे पाणी'(१९७०) शरद पोतदारांनी 'महाव्दार,'(१९७१)व 'वाघीण',(१९६०)दिनकर देशपांडे यांची 'तपझिरा,'(१९६०) पां.श्री.गोरे यांची 'कात टाकलेली नागीण,'(१९७१) रा.श.देसाई यांची 'इभ्रत,'(१९६३) बाजीराव पाटीलांची 'भंडारवाडी,'(१९६९)आणि 'भिण्सारचा डोंगर,'(१९७३) वामन तिखुडे यांची 'पालापाचोळा,'(१९७०)ह.मो.मराठे यांची 'तिसरी घंटा' अशा अनेक कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवनाचे चित्रण आले आहे. याशिवाय द.ता.भोसले यांच्या 'मी आणि माझा बाप'(१९६९) मधून विनोदनिर्मितीतून ग्रामीण जीवनाचे चित्रण आले आहे. तर बाबा भांड यांची 'जरंगा'(१९७८)दि.बा.मोकाशी यांची'देव चालले' लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'दूर गेलेले घर' आणि जयवंत दळवी यांची 'धर्मानंद '(१९८०)अशा अनेक कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील वेगवेगळ्या पातळीवरील चित्रण आले आहेत.

१९६० ते १९८० या काळातील ग्रामीण कादंबरी संमिश्र स्वरुपाची आहे. अनेक कारणांनी एकूण मराठी कादंबरीची प्रभावक्षेत्रे विस्तीर्ण झाली आहेत१९५० ते १९६० दशकाप्रमाणे या काळात ग्रामीण कादंबरी ही मराठी कादंबरीची प्रमुख व प्रभावी धारा राहिली नाही तथापि ग्रामीण कादंबरीने याही काळात एकूण मराठी कादंबरीच्या प्रवाहात आपले स्वत:चे स्थान जोपासले आहे.

# ६. उत्तम तुपे व बाबाराव मुसळे

## समकालीन ग्रामीण कादंबरी

उत्तम तुपे व बाबाराव मुसळे या दोन कादंबरीकारांच्या समकालीन लेखन करणाऱ्या कादंबरीकारांचा विचार करताना आपणाला १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचा विशेषत्वाने विचार करावा लागतो. हे दोन्ही कादंबरीकार आजतागायत लेखन करीत असल्यामुळे चालू संदर्भाचाही विचार करणे मला क्रमप्राप्त वाटते.

१९८० ते १९९० ह्या कालखंडातील ग्रामीण कादंबरी काही एका वेगळ्या वळणावर उभी राहिलेली दिसते. या दशकात जुन्या कादंबरीकारांपैकी एका दोघांनी श्रेष्ठ दर्जाची ग्रामीण कादंबरी लिहिली. अनेक नव्या दमाचे कादंबरीकार या क्षेत्रात झपाट्याने पुढे आले. त्यांनी ग्रामीण कादंबरीचा कायापलट घडविण्यास आरंभ केला.१९७५ च्या सुमारास दलित साहित्यापाठोपाठ ग्रामीण साहित्याच्या चळवळीनेही आपली भूमिका स्पष्ट केली. संमेलने मेळावे परिसंवाद यातून ग्रामीण नवलेखकांना आत्मभान आणले.आणि हे साहित्य 'आधुनिक ग्रामीण साहित्य' म्हणून ओळखले जाऊ लागले. या कालखंडात 'नटरंग'(आनंद यादव), 'सावट,' 'चारापाणी' (रा.रं.बोराडे) 'विषवृक्षाच्या मुळ्या,' (डॉ.वासुदेव मुलाटे) 'पांगिरा''झाडाझडती,'(विश्वास पाटील) 'भंडारभोग,' 'चौडकं'(राजन गवस) 'झुलवा,'(उत्तम बंडू तुपे) 'कावड'(बाबु बिरादार) 'हाल्या हाल्या दूधू दे'(बाबाराव मुसळे) 'मेन इन इंडिया'(पुरूषोत्तम बोरकर) 'कुणाच्या खांद्यावर'(बा.ग.केसकर) 'कागूद आणि सावली'(आनंद पाटील) 'लिगाड आणि खांदेपालट,'(मोहन पाटील) 'मेलेलं पाणी' 'बगाड'(अशोक व्हटकर) 'गांधारीचे डोळे'(नागनाथ कोत्तापल्ले) 'पाचर'(रामचंद्र पठारे) यासारख्या कादंबऱ्या हया वेगवेगळ्या विषयावर लिहिल्या गेल्या.

डॉ. आनंद यादवांनी 'नटरंग 'ही तमासगिरांच्या जीवनावर कादंबरी लिहून एक उपेक्षित विषय समाजापुढे खुला केला.

याचबरोबर 'झोंबी,' 'नांगरणी' या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांही प्रसिद्ध झाल्या आहेत. आनंद पाटील यांनी 'कागद आणि सावली'(१९८६)या दोन लघु कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचा नेमका वेध घेतला. पुरूषोत्तम बोरकर यांनी 'मेड इन इंडिया'(१९८७)या आपल्या पहिल्याच कादंबरीमध्ये इंग्रजी, मराठी,हिंदी या वेगवेगळ्या भाषांचे मिश्रण झालेल्या एका ढंगदार गंमतीदार भाषेत पंजाबराव नायकाचे आत्मकथन केलेले आहे.

डॉ.राजन गवस यांनी 'चौंडकं'(१९८५)आणि 'भंडारभोग'(१९८८)या कादंबऱ्या लिहून जोगतिणी आणि त्यांच्या जीवनाचे दु:खभोग चित्रीत केले. ही समस्या एका विशिष्ठ भूप्रदेशातली असली तरी समाजजीवन पोखरणारी, अनिष्ठ स्वरूपाची आहे. या प्रथांचं उच्छाटन व्हायला हवं असं ही कादंबरी वाचताना वाटत राहतं आणि याचजाणिवेतून राजन गवस यांनी या कादंबरीचे लेखन केलेले आहे. डॉ.वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या'(१९८९) ही कादंबरी सहकारी चळवळीचे स्वरूप विशद करणारी लिहिली. सर्वसामान्यांच्या आर्थिक विकास साधण्यासाठी सहकारी चळवळ महाराष्ट्रात जन्माला आली. पण या चळवळीने सर्वसामान्यांचा विकास साधण्याऐवजी आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या घटकांचाच विकास साधला या विदारक सत्याचे दर्शन या कादंबरीत घडते.

धरणग्रस्तांच्या दु:खाला वाचा फोडणारी 'झाडाझडती' ही विश्वास पाटलांची याच काळात प्रसिद्ध झालेली कादंबरी गेल्या जन्मीच्या पापाची झडती माणसाला या जन्मात द्यावी लागते; असा आपल्याकडे समज आहे. धरणग्रस्तांचं दु:ख हे असं झाडाझडतीसारखं आहे. राज्याच्या एखाद्या भागात धरण बांधण्याचा निर्णय शासन घेते पण या धरणाखाली अनेकांना आपली गाव,आपली घरं,इतकेच नव्हे तर तिला आपली काळी आई मानलेले आहे तिला सोडून पुनर्वसनासाठी इतरत्र हलावं लागतं. कोणताही अपराध नसताना, ध्यानीमनी नसताना दु:खाना,हालअपेष्ठांना सामोरं जावं लागतं. झाडाझडतीमध्ये विश्वास

पाटलांनी नेमकेपणाने हेच सांगितले आहे, तर 'पांगिरा'(१९९० )या कादंबरीतून पाण्याने समृद्ध असलेल्या भागात ऊसाच्या निमित्ताने कशी उधळपट्टी होते आणि शेवटी सगळे पाणी संपून गावागावात कशी भांडणे लागतात याचे चित्रण येते. एकूणच झपाट्याने शहरीकरण होत चाललेल्या खेड्यातील राजकारणाचा व समाजकारणाचा वेध घेणारी 'पांगिरा' ही एक अस्सल कादंबरी आहे.

रामचंद्र पठारे यांनी 'पाचर'(१९८९) या कादंबरीतून राजकारण लोकांचे पितळ उघडे करून मांडले आहे तर 'गांधारीचे डोळे' मधून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी राजकारणाचे हिडीस रूप व त्यातील सामाजिक बेगडीपण उघडकीस आणले आहे. प्रा.मोहन पाटील यांनी 'लिगाड आणि खांदेपालट' (१९९०) या दोन लघुकादंबऱ्यामधून आजकाल गावपातळीवर कशा प्रकारचं राजकारण सुरू आहे. विकासविषयक योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थींना मिळण्याऐवजी धनदांडग्यांच कसा मिळत आहे, या विकासविषयक योजना कार्यान्वित होण्यासाठी निर्माण झालेली सत्तास्थानं या धनदाडंग्यांच्या हाती कशी एकवटली आहेत., ही सत्ता स्थानं अबाधितपणे आपल्या घराण्यात रहावीत ते शक्य अथवा सोयीचे नसेल व त्यामुळे खांदेपालट आवश्यक असेल तर तो आपल्याला अनुकूल व्हावा यासाठी या धनदागंड्यांचा कसा आटापिटा सुरू आहे या धनदांडग्यांना विरोध करणे म्हणजे आपल्या मागे 'लिगाड' लावऊन घेण्यासारखं आहे म्हणून त्यांना विरोध करण्याऐवजी त्यांच्या स्वार्थी,हीन कृत्यांकडे डोळेझाक करण्याची वृत्ती कशी वाढत आहे. खेड्यापाड्यातही आजकाल अर्थकारण किती महत्त्वाचे मानले जात आहे व या अर्थकारणामुळं माणसं माणसांपासून कशी तुटत आहेत. स्वार्थी,भ्रष्ट्राचारी कशी बनत आहेत याचे नेमकं चित्रण करण्यात आलेलं आहे.

याचबरोबर बाबू बिरादार यांनी 'कावड,''मातीचे पाय,''गोसावी,' बा.केसकर यांनी 'कुणाच्या खांद्यावर,' व.ह.पिटके यांनी 'शिदोरी', सरदार जाधव यांनी 'कोयता' 'भिमराव वाघचौरे यांनी ''रानखळगी ' रवींद्र शोभणे

यांती 'कोंडी' अशा कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली.

थोडक्यात ग्रामीण जीवनात जसजसे बदल घडत गेले. तसतशी ग्रामीण कादंबरी बदललेली दिसते या बदलांचे दर्शन या ग्रामीण कादंबरीत होऊ लागले. ग्रामीण भागात नव्याने उदयास आलेल्या समस्याचे जुन्या व्यावसायिकांच्या जीवनातील संक्रमणाचे , विखुरलेल्या भटक्या जाती-जमातीचे, सहकार क्षेत्रातील चळवळीचे, शेतकरी आंदोलनांचे आणि शेतीविषयक विविध प्रश्नांचे प्राणी जीवनाचे कामगारांच्या समस्याचे ग्रामीण भागातील राजकारणाचे तसेच ग्रामीण जीवनातील दु:खस्थितीचे चित्रण अनेक कादंबरीकारांनी केले आहे. या कादंबऱ्यामध्ये अनुभवाचा वेगवेगळेपणा आहे. त्यांच्या आविष्कारावर पूर्वसूरींची दडपणे नाहीत. बाह्य वर्णनापेक्षा मूल्ये शोधण्याचाच प्रयत्न या कादंबरीकारांनी अधिक केलेला आहे. या सर्वच बाबतीत या कालखंडातील कादंबऱ्यामध्ये वेगळेपणा आलेला आहे. अर्थात पूर्वीच्या कालखंडाइतकी तोलामोलाची निर्मिती होत नाही तरिही अनुभवाचे नाविन्य, व्यापकता कादंबरीमध्ये येऊन ग्रामीण कादंबरीचा अधिकाधिक विकास झाला असेच म्हणावे लागेल.

## ७. उत्तम तुपे यांच्या कादंबरी लेखनाचे वेगळेपण

साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीलेखन कालखंडातील नव्या उमेदीच्या कादंबरीकारात उत्तम तुपे हे अग्रगण्य आहेत.१९६० नंतर ग्रामीण समाजातील विविध स्तरातील नवशिक्षित लेखक लिहू लागले. साठ पूर्वीची ग्रामीण व दलित कादंबरी स्थूलमानाने पांढरपेशा, मध्यमवर्गीय लेखकांनी लिहिली होती. परंतु साठनंतर रंजनापेक्षा वास्तव मांडण्याकडे अधिक कल असल्यामुळे ग्रामीण व दलित कादंबरीच्या अपेक्षा वाढल्या. महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, शंकर खंडू पाटील, द. ता. भोसले, तसेच बाबुराव बागुल, केशव मेश्राम, अशोक लोखंडे, भि. सी. शिंदे, भिमराव देठे, माधव कोंडविलकर, योगेंद्र मेश्राम, नामदेव ढसाळ, दि. ग. वाघमारे इ. समकालीनाबरोबर उत्तम बंडू

तुपे यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

उत्तम तुपे यांच्या कादंबऱ्या ग्रामीण आणि दलित पार्श्वभूमीवर लिहिल्या आहेत. ' इजाळं ' (१९८४) ही कादंबरी मातंग समाजातील शेतकरी व शेतमजूर कुटुंबाचे ग्रामीण आणि दलित जीवनाचे वास्तव संवेदनशिलतेने रेखाटणारी कादंबरी आहे. ' झुलवा ' (१९८६) या कादंबरीमुळे उत्तम तुपे सर्व महाराष्ट्राला परिचीत झालेले आहेत. ' लावला तर झुलवा न्हाय तर कुणबी हलवा ' असे जिणं वाट्याला आलेल्या परंतु शेवटी परिस्थितीविरूद्ध बंड करून उठलेल्या जगन या जोगतिणीची कथा ' झुलवा ' मध्ये चित्रित केली आहे. ' भस्म ' (१९९१) ही कादंबरी ग्रामीण भागातील मसनजोगी समाजावर आधारित आहे. ' खाई ' (१९८८) या कादंबरीत ग्रामीण भागातील दलित कुटुंबातील नववधू सासऱ्याच्या लैंगिक छळाला बळी पडून तिच्या जिवाची खाई ! खाई ! कशी होते याचे चित्रण येते.याचबरोबर ' कळाशी ' (१९८८), ' चिपाडं ' (१९८९), ' नासरी ', ' खुळी ' (१९९१) आणि ' लांबलेल्या सावल्या ' ' १९९२ ' या त्यांच्या एकंदरीत ग्रामीण भागातील अस्सल ग्रामीण वास्तवाबरोबरच दलितांच्या व्यापक जीवन जाणिवांचे त्याचप्रमाणे अनेक इतर जाती-जमातीचं दाहक अनुभव उजागर करणाऱ्या कादंबऱ्या आहेत तसेच ' काट्यावरची पोटं ' हे आत्मकथनही सुप्रसिद्ध आहे.

' झावळं ' (१९९१) ही कादंबरी ग्रामीण भागातील नदीवर, ओढ्यावर, मासेमारी करणाऱ्या ' कोळी ' जमातीच्या जीवनाचे दाहक वास्तव दर्शन घडविते. नव्या कृषी संस्कृतीच्या उदयाने नदीवर धरणे बांधली गेली व या योजनांचा फायदा शेतकरी वर्गाला झाला परंतु नदीवर मासेमारी करणाऱ्या ' कोळी ' जमातीवर उपासमारीची पाळी आली. त्याचा व्यवसाय बंद होऊन अंधाधूंदी माजली. याचेच चित्रण तुपे यांनी कादंबरीत केले आहे. कोळी जमातीच्या जीवनात एकाकी निर्माण झालेल्या भयानक पोकळीचे घडणारे दर्शन तुपे यांनी ' झावळं ' मध्ये

शब्दबद्ध केलं आहे. प्रादेशिकतेच्या गावरान रांगडेपणामुळे या कादंबरीला आकार येतो.

एकूणच विविध विषयावर लेखन करुन तुपे यांनी आपल्या समकालीनांमध्ये वेगळ्या वाटा शोधल्या. नव्या आशा पल्लवीत केल्या. त्यांची प्रत्येक कादंबरी मनमोकळेपणाणे आविष्कृत झालेली आहे. ग्रामीण जीवन खऱ्या अर्थाने त्यांनी उत्तेजित करून पूर्वीचीच ग्रामजीवनाची अनुभूती वेगळ्या मार्गाने मांडल्याचे जाणवते. त्यांची कादंबरी रंजनवादी न आढळता ग्रामीण व दलित समस्याच्या पार्श्वभूमिवर अस्सल जाणवते. ते ग्रामजीवन स्पष्ट करतात. कुठेच जातीय तनावांना स्पर्श केलेला नाही. त्यांची भाषा माणदेशी बोलीत असली तरी तिच्यावर पूणेरी संस्कार झाल्याचे जाणवते. कोणताही न्यूनगंड न ठेवता तुपे यांनी लेखन केले यातच त्यांचे यश आहे.

## ८. बाबाराव मुसळे यांच्या कादंबरी लेखनाचे वेगळेपण

१९८० नंतर उदयास आलेल्या नवीन प्रमुख कादंबरीमध्ये बाबाराव मुसळे यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रामीण कलाविषयक भान मुसळे यांना वाजवीपेक्षा अधिक आढळते. ग्रामीण भागात राहून त्यांनी आपले ग्रामीणत्त्व ' हाल्या हाल्या दूधू दे ' (१९८५), आणि ' पखाल ' (१९९५) ' वारूळ' (२००५) या तीन कादंबऱ्यामधून व्यक्त केले. शेतकऱ्याचं शेतकरी म्हणून तसचं कौटुंबिक जीवनाचा एक घटक म्हणून दु:खद जगणं मुसळे यांच्या ' हाल्या हाल्या दूधू दे ' या कादंबरीचा विषय आहे. शेतकऱ्यांच शेती उत्पादन वाढावं, त्याचे जीवन उंचावं यासाठी संकरित बियाणं उत्पादीत झालं पण या संकरीत बियाणाच्या नावाखाली इतकं खोटं बियाणं शेतकऱ्यांच्या पदरी पडतं की, त्यामुळं तो कसा कायमचा दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकून पडतो. याचं मन व्यथित करणारं चित्रण कादंबरीत आलेलं आहे. या कादंबरीच्या प्रस्तावनेत द. दि. पुंडे लिहितात, " ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होणारा जीवनानुभव हा ग्रामीण जीवनानुभव असावा लागतो तो ग्रामीणतेशी केवळ संलग्न असून

चालत नाही तर तो ग्रामीण जीवनाचा एक अपरिहार्य भाग असावा लागतो." [१२] तो या कादंबरीत असल्याचे आपणास जाणवते.

याचबरोबर मुसळे यांनी ' पखाल ' (१९९५) या कादंबरीतही परंपरागत पखालीने पाणी वाढणाऱ्या कोळी बलुत्याची शोकांतिका चित्रीत केलेली आहे. या दोन कादंबऱ्यातून मुसळे यांनी विदर्भातील ग्रामीण वास्तव पकडण्याचा प्रयत्न केला आहे. एकूणच मुसळे यांनी या दोन्ही कादंबऱ्यामधून ग्रामीण वास्तव वेगवेगळे विषय घेऊन मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## ९. समारोप

ग्रामीण कादंबरीच्या आरंभापासून म्हणजे ' बळीबा पाटील ' या कादंबरीपासून ग्रामीण कादंबरी लेखनास सुरूवात झाली. १९२० नंतरच्या कालखंडात गांधीजींच्या प्रभावातून खेड्याचे जीवन चित्रीत होऊ लागले. पुढे प्रादेशिक कादंबरीच्या रूपाने श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर यांच्या प्रादेशिक कादंबरी लेखनाने ग्रामीण कादंबरीच्या कक्षा रूंदावत गेल्या. तर दलित कादंबरीस अण्णाभाऊ साठे,विभावरी शिरूरकर यांच्या लेखनाने सुरूवात झाली.

१९६० नंतर अस्सल ग्रामीण जीवनाचे चित्रण होऊ लागले. 'बनगरवाडी' च्या रूपाने वास्तव ग्रामीण कादंबरीचा जन्म झाला. याच कालखंडात 'गोतावळा','पाचोळा' आणि 'धग' या कादंबऱ्यामुळे ग्रामीण कादंबरी अधिक समृद्ध होत गेली, तर दलित, कादंबरीमध्ये वास्तवतेच्या रूपाने 'फकिरा','मुक्तीसंग्राम','बलिदान''पारधी','झुलवा' या कादंबऱ्यामुळे दलित कादंबरी अधिक समृद्ध होत गेली.

१९७०-८० या कालखंडात ग्रामीण आणि दलित जीवनाचे बदलते प्रश्न त्यांच्या समस्या चित्रीत करण्यात ग्रामीण व दलित कादंबरीकारांना यश आले. त्यातून ग्रामीण आणि दलित जीवनाच्या विविधागांची चर्चा होऊ लागली. या नव्या पिढीमध्ये रंगनाथ पठारे,

वासुदेव मुलाटे, पुरूषोत्तम बोरकर, राजन गवस, महादेव मोरे, मोहन पाटील, केशव मेश्राम यांच्याबरोबर उत्तम बंडू तुपे आणि बाबाराव मुसळे यांनीही मोलाची भर घातली.

उत्तम तुपे यांच्या 'झावळं' आणि बाबाराव मुसळे यांच्या 'पखाल' या कादंबऱ्यांच्या आशयाचे स्वरूप पुढील प्रकरणामध्ये अभ्यासू.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. स.ग.मालसे, 'तारतम्य' परचुरे प्रकाशन, मुंबई,प्रथमावृत्ती १९८७. पृष्ठ-७

२. नागनाथ कोत्तापल्ले,(संपादक)'पाचोळा आणि दहा समीक्षक'(प्रस्तावना), साहित्यसेवा प्रकाशन,औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८९. पृष्ठ-२५

३. आनंद यादव,'ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती १९८१ पृष्ठ-११७

४. चंद्रकुमार नलगे,(संपादक)'ग्रामीण वाङ्:मयाचा इतिहास'सुरेश एजन्सी प्रकाशन,पुणे. 'ग्रामीण कादंबरी:प्रारंभ ते १९६०' (लेख )डॉ. वासुदेव मुलाटे पृ-१२ प्रथमावृत्ती, १९९६.

५. उषा हस्तक , 'प्रतिष्ठान' ऑक्टोंबर .१९६१

६. रवींद्र ठाकूर, 'मराठी ग्रामीण कादंबरी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती १९९३, पृष्ठ-५८

७. नागनाथ कोत्तापल्ले, 'पाचोळा आणि दहा समीक्षक'(संपादन)प्रस्तावना., ' साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद' प्रथमावृत्ती, १९८९

८. चंद्रकुमार नलगे, (संपादक ) 'ग्रामीण वाङ्:मयाचा इतिहास "ग्रामीण कादंबरी: प्रारंभ ते १९६०' या लेखात डॉ.वासुदेव मुलाटे '

सुरेश एजन्सी प्रकाशन , पु णे. प्रथमावृत्ती १९९६, 'पृष्ठ-२२.

९. अ.ना.देशपांडे, 'आधुनिक मराठी वाङ्:मयाचा इतिहास'भाग-२, व्हीनस प्रकाशन, पुणे, दूसरी आवृत्ती , १९७०,पृष्ठ-१७७

१०. चंद्रकुमार नलगे,(संपादक)'ग्रामीण वाङ्:मयाचा इतिहास'सुरेश एजन्सी प्रकाशन,पुणे. 'ग्रामीण कादंबरी:प्रारंभ ते १९६०' (लेख) डॉ. वासुदेव मुलाटे पृ-२८ प्रथमावृत्ती १९९६,

११ नागनाथ कोत्तापल्ले (संपादक) 'प्रतिष्ठान','कादंबरी समिक्षा विशेषांक', म.सु.पाटील, (लेख) मराठवाडा साहित्य प्रकाशन, औरंगाबाद', प्रथमावृत्ती १९८१, पृष्ठ३५.

१२ द.दि.पुंडे, (प्रस्तावना) 'हाल्या हाल्या दूधू दे' , (कादंबरी)(बाबाराव मुसळे) मेहता 'पब्लिशिंग हाउस, 'पुणे. प्रथमावृत्ती १९८५, पृष्ठ १३.